दिनांक:- ०९/०५/२०१८
चंदननगर पो.स्टे. पुणे शहर

## प्रेस नोट

**घरफोडी गुन्हा फक्त २ तासात उघडकीस आणुन आरोपीस लागलीच अटक करुन सुमारे १०,५६,०००/- रु. (१० लाख ५६ हजार रु.)चा माल जप्त करुन ३ गुन्हे उघडकीस आणलेबाबत**

चंदननगर पोलीस स्टेशन गु. र. नं. १३२/२०१८, भा. द. वि. कलम ४५४, ४५७, ३८० मधील फिर्यादी तनय गोविंद अग्रवाल वय-३० वर्षे रा. अल्टीस ड्रोम सोसायटी, फलॅट नं.६०५, जुना मुंढवा रोड, चंदननगर, पुणे यांनी फिर्याद दिली की, दि.०६/०५/२०१८ रोजी दुपारी १४/०० वा. ते दि. ०८/०५/२०१८ रोजी रात्रौ २२/०० वा. दरम्यान राहते घरास कुलुप लावुन बंद असताना अज्ञात आरोपीने टेरेस वरुन बाल्कनीमध्ये उतरुन गॅलरीचे लॉक तोडुन फलॅटमध्ये प्रवेश करुन कपाटामधील १०,६७,९५०/- रु. किंमतीचे सोन्याचे व डायमंडचे दागिने, परकीय चलन, स्पीकर व हेडफोन असा माल चोरुन नेला म्हणुन तक्रार दिलेने वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चंदननगर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ तपास करुन मिळालेले बातमीचे आधारे सदर गुन्हयामध्ये आरोपीत नामे हिम्मत पीटर डी रीबेला रा. ४०१ अल्ट्रीस ड्रोम सोसायटी, वाढेश्वरनगर, जुना मुंढवा रोड, चंदननगर, पुणे यास आज दि.०९/०५/२०१८ रोजी १०/०० वा. अटक करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला असुन आरोपी कडुन सदर गुन्हयातील गेले मालापैकी १०,१६,०००/-रु किमंतीचे सोन्याचे, हि-याचे दागिने व इतर मालमत्ता हस्तगत केलेली आहे. सदर आरोपीताकडुन आणखी अं. ४०,०००/- किंमतीचे सोन्या, चांदीचे दागिने हस्तगत केले असुन सदर आरोपीने आणखी २ ठिकाणी घरफोडया केल्या असल्याचे तपासा दरम्यान निष्पन्न झाले आहे.

सदर अटक आरोपीता विरुध्द येरवडा पोलीस स्टेशन येथे सन-२०१२ ते सन-२०१५ या कालावधीत घरफोडी चोरीचे २६ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई मा. अप्पर पोलीस आयुक्त सो, श्री. सेनगांवकर, मा. पोलीस उप आयुक्त श्री, गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त, श्री. मिलींद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली चंदननगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मुळीक, पोलीस उप निरीक्षक संदीप साळुंखे, पोलीस उप निरीक्षक श्रीधर भोसले, पो हवा ३७८४ धुमाळ, पोलीस हवालदार ५३८६ राऊत, पो ना २९२५ खराडे, पो ना ५८२२ रोकडे व पोलीस नाईक १४२३ शिंदे यांनी केलेली आहे. आरोपीताकडे सखोल तपास करुन पुढील कारवाई करीत आहोत.